महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/८/४६-एफ/लिपिक-ल.ले.पदोन्नती/३४४/२०१३/सीई-५७० मुंबई, दि.१८/१२/२०२३.

वाचा :- १. लघुटंकलखेक (सेवा प्रवेश ) नियम १९९७, दि.३१/०७/१९९७.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना,क्र.सेप्रनि १५०७/प्र.क्र.१३४/०७/१४-अ, दि.१९/११/२००८.
३. गृह विभाग, शासन निर्णय, क्र.एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/पुर्नबांधणी क्र.१५/ पोल-५ब, दि.१६/१२/२०१६.
४. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१.
५.गृह विभाग, शासन पत्र, क्र.रापोसे-०१२१/प्र.क्र.७५(भाग-२)/पोल १-अ, दि.०७/०९/२०२१.

**-: आदेश :-**

*****

शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/पुर्नबांधणी क्र.१५/पोल-५ब, दि.१६/१२/२०१६ अन्वये पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या संवर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकूण १५ पदे लघुटंकलेखक पदावर श्रेणी अवनत करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे पोलीस महासंचालकाच्या शहर लिपिक संवर्गात लघुटंकलेखकांची १५ पदे नव्याने निर्माण झाली आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना दि.१९/११/२००८ अन्वये बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लघुटंकलेखक पदाचे सेवाप्रवेश नियम १९९७ मध्ये बदल केले असून पदोन्नती व सरळसेवेचे प्रमाण ५०:५० टक्क्यावरुन अनुक्रमे २०:८० टक्के असे केले आहे. त्यामुळे मंजूर १५ पदापैकी पदोन्नती कोट्यातून ३ व सरळसेवा कोट्यासाठी १२ पदे भरावयाची आहेत. उक्त शासन निर्णयान्वये, वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लघुटंकलेखक पदासाठी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे अर्हता प्रमाणपत्र धारकांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात यावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार, पोलीस महासंचालकांच्या शहर लिपिक संवर्गातील खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपिक (अराजपत्रित, गट-क) यांनी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र सादर केल्याने व सदर पदोन्नतीमुळे त्यांच्या मुळ लिपिक संवर्गातील पदोन्नतीचे लाभ तसेच आश्वासित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा हक्क संपुष्टात येणार असल्याबाबतच्या अटी व शर्ती मान्य केल्याबाबत लेखी बंधपत्र सादर केल्याने, त्यांना कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासुन, लघुटंकलेखक (अराजपत्रित, गट-क) (वेतनस्तर एस-८:२५५००-८११००/-) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असुन, पदोन्नतीवर त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | सध्याचे नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवर नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | श्री. सचिन मोहरसिंग जाधव | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय. | राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई | संवर्गातील रिक्त पदात |

२. उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेली पदोन्नती हे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६ - ब, दि. ०७/०५/२०२१ अन्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार व विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून **निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात** देण्यात येत आहे.

३. उपरोक्त प्रमाणे पदोन्नती/बदली झालेल्या कर्मचारी यांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणांची यादी पदमोचक लिपिक कर्मचाऱ्याकडे किंवा संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता द्यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

पदोन्नत कर्मचारी यांचे अभिनंदन !

१५/२/२३

**(डॉ. निखिल गुप्ता)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

श्री. सचिन मोहरसिंग जाधव, वरिष्ठ श्रेणी लिपिक
(मार्फत :- कार्यासन अधिकारी, का.क्र.२७)

प्रत,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पुर्व), मुंबई. (सस्नेह)

कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, २७, ३२ व ३६.

२. कार्यासन अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधित पदोन्नत कर्मचाऱ्यांना उक्त आदेशातील परिच्छेद क्र.३ मधील नमूद बाबींची पूर्तता करुनच बदली कर्मचारी हजर होण्याची प्रतीक्षा न करता पदोन्नतीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता त्यांच्या कार्यासनातून सत्वर कार्यमुक्त करुन तसे या कार्यासनास (का.क्र.८) कळवावे.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई

२. पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे एक महिन्यासाठी उपलब्ध करून द्यावेत.

१४/२/२३

**( निसार तांबोळी)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.